cet cell


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल: edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ: www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४८१९/२५३६ दि. ८ नोव्हेंबर,२०१९

## प रि प त्र क

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्याक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश छाननी / पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.**

संदर्भ:-
१. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे परिपत्रक प्रनिप्रा / प्र.क्र.६६ / नोंदणी प्रक्रिया / २०१९ / ८८४, दि.२१/९/२०१९
२. कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४८१९/२३४५ दि.१५/१०/२०१९
३. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे परिपत्रक क्र.प्रनिप्रा / प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया / २०१९/२०१९/९८७, दि. ३१/१०/२०१९.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सफलता पोर्टलद्वारे (www.saflata.org) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्यात येणार असल्याने कृषी परिषद कार्यालयाच्या संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकान्वये सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक अभ्याक्रमास पहिल्या वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेकरिता वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते. तथापि, सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकान्वये विषयाधीन प्रकरणी कार्यवाही करण्याच्या तारखा व कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

यास अनुसरून राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाशी संबंधित सर्व संस्था / महाविद्यालये यांना सूचित करण्यात येते की, विना अनुदानित संस्था / महाविद्यालये / शासकीय / अनुदानित महाविद्यालये यांनी संबंधित कृषी विद्यापीठाकडे प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रासह सादर न करता संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सफलता पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत प्रक्रिया पूर्ण करावी.

प्रवेश अर्जासोबत उमेदवाराने जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत, ती सर्व कागदपत्रे सफलता पोर्टलवर उपलब्ध आहेत. याव्यतिरिक्त उमेदवाराच्या प्रवेशासंबंधी अनिवार्य कागदपत्रे

Scanned by CamScanner

अपलोड करावयाची असल्यास संबंधित महाविद्यालयाने सफलता पोर्टलवर त्यांच्या लॉगइनद्वारे अपलोड करावीत. (जात पडताळणी प्रमाणपत्र दि.२/८/२०१९ नंतर निर्गमित केलेले नसावे. इतर कागदपत्रे दि.२०/७/२०१९ नंतर निर्गमित केलेली नसावीत, याची दक्षता घ्यावी.)

चारही कृषी विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, सफलता पोर्टलचे क्रिडेन्शीयल त्यांना यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. कृषी विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात प्रवेशित उमेदवारांचे प्रवेशाचे वाटप ज्या धर्तीवर झालेले आहे, ती कागदपत्रे आणि इतर अनिवार्य कागदपत्रे सफलता पोर्टलवर आहेत, याची खातरजमा करण्याची कार्यवाही त्वरीत सुरु करावी. कागदपत्र योग्य असल्यास Valid करावे, योग्य नसल्यास Invalid असे Remarks देऊन योग्य नसल्याचे कारण (descripancy) नमूद करावे. सर्व कागदपत्रे योग्य असल्यास उमेदवाराचा प्रवेश मंजूर (Approve) करावा.

कागदपत्र योग्य नसल्याच्या कारणाची (descripancy) पूर्तता संबंधित महाविद्यालयास दि.१५/१२/२०१९ पर्यंतच करता येईल, याची प्रत्येक महाविद्यालयाने तसेच अपूर्तता दर्शविण्याच्या दृष्टिकोनातून कृषी विद्यापीठांनीसुध्दा नोंद घ्यावी.

संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने या कार्यालयाच्या संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकात नमूद केलेली प्रत्येक विद्यार्थ्याकडून रू.६०/- तपासणी शुल्क आकारण्याची कार्यपध्दती अवलंविण्यात येऊ नये.

(विश्वजीत व. माने)
महासंचालक

प्रति,

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
२. प्राचार्य, सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये.

प्रतः-

१. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी..
२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर अपलोड करावे. तसेच याबावत सर्व महाविद्यालयांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करावे.
३. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

Scanned by CamScanner